## नियमित फौजदारी खटला क्र.२९/२०२३ मधील निशाणी क्र.१ खाली आदेश

## (पारित दिनांक ०२ जुलै, २०२६)

सदरचे दोषारोपपत्र भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२५, १४३, १४७, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये एकुण पाच यांचेविरुध्द् सन २०२३ साली दाखल झाले आहे. सदर आरोपींविरुध्द् निशाणी ४४ वर दि.११.१२.२०२४ रोजी दोषारोप निश्चीत करण्यात आले.

०२. आज रोजी अभियोग पक्षातर्फे फिर्यादी व जखमी साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली. दोन्ही साक्षीदार अभियोग पक्षास फितूर झाले. फिर्यादी व आरोपी यांच्यात तडजोड झाल्याबाबत अभिलेखावर आले आहे. तसेच, फिर्यादीने पुरशिस दाखल करून प्रकरण पुढे चालवायचे नसल्याचे नमुद केले. प्रकरणातील साक्षीदार१ व २ हे अभीयोग पक्षास फितुर झाल्यामुळे इतर साक्षीदारांच्या साक्षीचा काहीही उपयोग हाणार नाही. तसेच अभीयोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ व २ यांच्या साक्षीतुन आरोपींविरुध्द् पुरावा आला नसल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) अन्वयेचे निवेदन वगळण्यात येते.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2026.07.02 17:08:37 +0530

ठिकाणः दौंड,

दि.०२/०७/२०२६

**(एस.एन पाटील)**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.२, दौंड ता.दौंड, जि.पुणे.